# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२२

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### राज्यातील अनेक विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहत असल्याबाबत

**(१) ९५० (१८-०३-२०२०) श्री.किशोर दराडे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक विद्यार्थी एन.एम.एम.एस.गुणवत्ता यादीमध्ये समाविष्ट झाले असून सदर विद्यार्थ्यांचे नाव हे नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलमध्ये भरण्यासाठी शाळांना एन.एम.एम.एस. पोर्टलमध्ये कोणतीही लिंक उपलब्ध होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील शिष्यवृत्तीपासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१४-०६-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विद्यार्थ्यांना वाहतुकीची सुविधा किंवा भत्ता देण्याच्या निर्णयाबाबत

**(२) ३२४१ (२८-०५-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ९१७ गावे व वस्त्यांच्या तीन किलोमीटरच्या परिसरात शाळा नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आजही अनेक विद्यार्थी नदी ओलांडून ज्याठिकाणी पायी जाण्यासाठी पाऊल वाटाही नाहीत तेथून पायी प्रवास करीत असल्याने अशा ठिकाणच्या विद्यार्थ्यांना वाहतुकीच्या सुविधा कशा प्रकारे पुरवल्या जाणार आहेत, तसेच राज्यातील दुरवर प्रवास करावा लागणाऱ्या साडेचार हजाराहून अधिक विद्यार्थ्यांना वाहतुकीची सुविधा किंवा भत्ता देण्याचा निर्णय शिक्षण विभागाने माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अशा प्रकारच्या गाव-वस्त्यांमध्ये रस्ते बांधून विद्यार्थ्यांना वाहतुकीची व्यवस्था करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२०-०६-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सर्वसाधारण क्षेत्रात ५०० लोकसंख्या असलेली व आदिवासी क्षेत्रात २५० लोकसंख्या असलेली गावे प्रधानमंत्री ग्रामसडक योजना व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत बारमाही रस्त्याने जोडण्यात येत आहेत. तसेच, विद्यार्थ्यांना वाहतुकीची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी दिनांक २० फेब्रुवारी, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये वस्तीस्थाने (Habitation) निश्चित केली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिक्षकांच्या दिनांक २ मे, २०१२ नंतर झालेल्या नेमणुकांबाबत

**(३) ३९५२ (१५-०७-२०२०) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षकांच्या भरतीस दिनांक २ मे, २०१२ नंतर बंदी असल्याचे कारण देत शिक्षकांच्या नेमणुकीबाबत चौकशी करण्यात आल्यानंतर शिक्षकांच्या भरतीस दिलेल्या मान्यता अमान्य केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षकांच्या भरती नियमित करुन त्यांचे वेतन पुन्हा सुरु करण्याची शिफारस शिक्षण आयुक्त यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षकांचे वेतन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०२-०४-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे

(२) होय, हे खरे आहे

(३) सदर प्रकरणी शासनाचे प्रचलित नियम, शासन निर्णय, परिपत्रके इ. मधील तरतुदीनुसार तपासून निर्णय घेण्याच्या सूचना आयुक्त, शिक्षण, पुणे यांना दिनांक २६/०३/२०२० च्या शासन पत्रान्वये देण्यात आलेल्या होत्या. त्यानुषंगाने आयुक्त, शिक्षण यांनी विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांना दिनांक ०८/०५/२०२० च्या पत्रान्वये कळविले आहे.

(४) प्रश्न उभ्दवत नाही.

---

## राज्यातील सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळणेबाबत

**(४) ४३५७ (०८-०९-२०२०) डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळत असताना केवळ अनुदानित संस्थेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना या लाभापासून वंचित ठेवण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनुदानित संस्थेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लाभ मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१०-०६-२०२२) :** (१) होय.
(२) शासनाच्या आर्थिक परिस्थितीनुसार अनुदानित संस्थेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांबाबत शासन योग्यवेळी धोरणात्मक निर्णय घेईल, असे अभिप्राय वित्त विभागाने दिले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## निसर्ग चक्रीवादळामध्ये नुकसान झालेल्या शाळांना मदत करण्याबाबत

**(५) ८४०० (१५-०६-२०२१) श्री.कपिल पाटील, श्री.अनिकेत तटकरे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात प्रामुख्याने कोकण प्रदेशात मागील वर्षी दिनांक ३ मार्च, २०२० रोजी आलेल्या निसर्ग चक्री वादळामुळे रायगड जिल्ह्यातील १ हजार ५५१ शाळा इमारतीची पडझड होऊन नुकसान झाले असून काही तालुक्यातील पंचनामे झालेल्या शाळांना शासनाने अद्यापी कोणतीही मदत दिलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा प्रशासनाच्या मागणीनुसार शासनाने राष्ट्रीय आपत्ती निवारण व्यवस्थापन (एनडीआरएफ) निधीमधून रुपये २४ कोटी २१ लाख ५० हजार तर समग्र शिक्षा अंतर्गत रुपये ४ कोटी ४ लाख ४० हजार इतका निधी मंजूर केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यापैकी एनडीआरएफमधून रुपये १२ कोटी ४० लाख १४ हजार तर समग्र शिक्षा योजनेतून रुपये ३ कोटी १३ लाख ४० हजार इतकाच निधी उपलब्ध झाल्यामुळे १ हजार ५५१ शाळांपैकी अद्याप ७३३ शाळा दुरुस्ती अभावी पडून असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शाळा दुरुस्तीसाठी मंजूर झालेल्या एकूण निधीमधून उर्वरित निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१८-०५-२०२२)** : (१) अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

निसर्ग चक्रीवादळामुळे रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या एकूण १५५१ शाळांचे नुकसान झाले होते व रुपये २४ कोटी २१ लक्ष इतक्या निधीची मागणी करण्यात आली होती

राष्ट्रीय आपत्ती निवारण व्यवस्थापन (एनडीआरएफ) च्या निकषानुसार ७३० शाळांच्या दुरुस्तीकरीता प्रतिशाळा रुपये २ लक्ष रुपयांच्या मर्यादेत रुपये १२ कोटी ४८ लक्ष इतका तसेच समग्र शिक्षा अंतर्गत ११७ शाळांच्या दुरुस्तीकरीता रुपये ४ कोटी ४ लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आला आहे.

जिल्ह्यातील शाळांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने व प्रतिशाळा दुरुस्तीसाठी रुपये २ लक्ष मर्यादेतील निधी अपूरा पडत असल्याने उर्वरित निधी जिल्हा नियोजन व जिल्हा परिषद सेस फंडातून उपलब्ध करुन देण्याची तजवीज ठेवली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील ३७ टक्के शाळांत पेयजल सुविधा उपलब्ध करण्याबाबत

**(६) ९३३७ (२०-०७-२०२१) डॉ.रणजित पाटील** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या एकूण ६५ हजार ८८६ शाळांपैकी ३७ टक्के शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध नसल्याची माहिती यु-डायस प्लसने सन २०१९-२०२० मध्ये केलेल्या पाहणीत निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू सर्व शाळांमध्ये शुध्द पेयजल उपलब्ध होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१७-०६-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची कायमस्वरुपी व्यवस्था उपलब्ध नाही, अशा शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय करण्याबाबत दिनांक २९ जून, २०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार संबंधित शाळा व्यवस्थापन समितीमार्फत कार्यवाही करण्यात येते. तसेच जल जीवन मिशन अंतर्गत राज्यातील शाळांमध्ये नळाद्वारे शुध्द पेयजल सुविधा उपलब्ध करण्याबाबत दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलास जोडणाऱ्या सांताक्रुझ-चेंबूर लिंक रोडचा एमटीएनएल जंक्शन येथील गर्डर कोसळून झालेला अपघात

**(७) १०४३७ (२०-११-२०२१) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलास जोडणाऱ्या सांताक्रुझ-चेंबूर लिंक रोडचा एमटीएनएल जंक्शन येथील गर्डर दिनांक १७ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास पहाटे चार वाजता कोसळून १४ कामगार जखमी झाल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पाचे कंत्राटदार जे. कुमार यांना मुंबई महानगरपालिकेने काळया यादीत टाकले असतानाही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अनेक कामांचे कंत्राट जे. कुमार या कंत्राटदारास दिले असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय अढळून आले, चौकशीनूसार सदर प्रकरणी मुंबई महानगरपालिकेने काळया यादीत टाकलेल्या कंत्राटदारावर व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१४-०६-२०२२)** : (१) दिनांक १७ सप्टेंबर, २०२१ रोजी पहाटे सुमारे ०४.३० वाजता मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलास जोडणाऱ्या सांताक्रुझ-चेंबूर लिंक रोडच्या एमटीएनएल आर्मवरील स्टील गर्डर कोसळल्यानंतर तेथे काम करणाऱ्या १४ कामगारांपैकी १३ कामगारांना किरकोळ दुखापत झाली, त्यांना प्रथमोपचार देऊन रुग्णालयातून त्वरीत सोडण्यात आले व एका कामगारास सर्व तपासणी अंती योग्य त्या उपचारानंतर रुग्णालयातून सोडण्यात आले.
(२) सदर प्रकल्पाच्या कामाचे कंत्राट हे निविदेतील अटी व शर्तीची पूर्तता झाल्यानंतरच मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि., यांना देण्यात आलेले आहे.
(३) व (४) सदर घटनेसंदर्भात बीकेसी पोलीस चौकीमध्ये कंत्राटदारावर भा.द.वि. ३३७, ३३८ व ३३६ अन्वये दिनांक १७ सप्टेंबर, २०२१ रोजी एफआयआर दाखल करण्यात आला आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणी दिनांक १७ सप्टेंबर, २०२१ रोजी तज्ञ समिती नेमण्यात आली होती. सदर समितीचा अहवाल मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास दिनांक २१ ऑक्टोबर, २०२१ रोजी प्राप्त झाला असून याबाबत तज्ञ समितीने केलेल्या शिफारशींनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने कंत्राटदारास (मेसर्स. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि.) रुपये १ कोटी इतका दंड ठोठावण्यात आला असून कंत्राटदाराच्या प्रकल्प व्यवस्थापकास पुढील २ वर्षासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या प्रकल्पात काम करण्यास प्रतिबंधित करण्यात आले आहे तसेच प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारास [मे. पेडॅको कं. लि.(जपान)] रुपये २० लाख इतका दंड व पुढील १ वर्षासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या नवीन कामात सहभाग घेण्यास मनाई करण्यात आली आहे. त्यासोबतच प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या संबंधित दोषी अभियंतास सदर प्रकल्पात पुढील २ वर्षासाठी काम करण्यास प्रतिबंधित करण्यात आले आहे.

---

## राज्य शासनाच्या नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीबाबत

**(८) १०५६० (०६-०१-२०२२) श्री.अरुण लाड, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने नवीन शैक्षणिक धोरणाची सन २०२० पासून अंमलबजावणी सुरु केली असून वयोगट ३ ते ६ पूर्व प्राथमिक शासकीय विद्यालये सुरु करण्यासंबंधी शासनाचे नियोजन काय आहे,

(२) असल्यास, इयत्ता ११ वी, व १२ वीची कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवसाय अभ्यासक्रम अशी विभागणी नवीन शैक्षणिक धोरणाप्रमाणे रद्द झाल्याने विज्ञान क्षेत्रात जाणाऱ्या व पुढे वैद्यकीय व अभियांत्रिकी क्षेत्रात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना फिजिक्स, केमेस्ट्री, बायोलॉजी, गणित हे विषय ऐच्छिक असणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच नवीन शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय व अभियांत्रिकी क्षेत्रातील प्रवेशाचा मार्ग बंद होणार आहे, हे खरे आहे काय ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२०-०६-२०२२) :** (१) नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी भारत सरकार आणि राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी दिलेले वेळापत्रक व मार्गदर्शक सूचनांना अनुसरून टप्प्याटप्प्याने कार्यवाही सुरू आहे.

(२) भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, गणित हे विषय ऐच्छिक राहणार असल्याचे शैक्षणिक धोरणात नमूद करण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

---

## राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत कार्यरत सहा.अभियंता श्रेणी-२ व शाखा अभियंताना पदोन्नती देवूनही अद्याप पदस्थापना मिळाली नसल्याबाबत

**(९) १०८८६ (०५-०१-२०२२) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर : तारांकित प्रश्न क्रमांक ६३६१ ला दिनांक १० मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत कार्यरत सहा.अभियंता श्रेणी-२ व शाखा अभियंता अशा एकूण २०० अधिकाऱ्यांना दिनांक १२ नोव्हेंबर, २०२० रोजी पदोन्नती देवूनही त्यांना अद्याप पदस्थापना मिळाली नसल्याचे दिनांक २४ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी उच्च न्यायालयाने स्पष्ट निर्णय व निर्देश दिले असताना देखील सदर अभियंतांना दिव्यांगाच्या ४ टक्के आरक्षणासह पदोन्नती देण्याचे सुचित करूनही संबंधित अभियंतांना अद्याप पदस्थापना दिल्या गेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अभियंतांना दिव्यांगाच्या ४ टक्के आरक्षणासह तात्काळ पदस्थापना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (०८-०६-२०२२) :** (१), (२) व (३) सहायक अभियंता श्रेणी-२ संवर्गातून उप विभागीय अभियंता या पदावर आणि कनिष्ठ अभियंता संवर्गातून उप विभागीय अधिकारी या पदावर फक्त पदोन्नती देण्याचे आदेश दिनांक १२/११/२०२० रोजी निर्गमित करण्यात आले होते. सदर पदोन्नत अभियंत्यांचे पदोन्नती उपरांत पदस्थापनेचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील असे आदेशात नमूद करण्यात आले होते. त्यानंतर दिव्यांग कर्मचाऱ्यांना पदोन्नतीमध्ये आरक्षण देणे या विषयाबाबत मा.उच्च न्यायालयातील प्रकरणामुळे उपरोक्त अधिकाऱ्यांना पदस्थापना देता आली नव्हती.

मा.उच्च न्यायालयाचे आदेश विचारात घेऊन शासनाने दिनांक ०५/०७/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिव्यांग व्यक्तींना पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार उप अभियंता संवर्गात दिव्यांग व्यक्तींना पदोन्नतीमध्ये आरक्षण देऊन सहा. अभियंता श्रेणी-२ संवर्गातून उप विभागीय अभियंता पदावर दिनांक ०७/१०/२०२१ व दिनांक १३/१०/२०२१ रोजी तसेच कनिष्ठ अभियंता संवर्गातून उप विभागीय अधिकारी पदावर दिनांक ०३/१२/२०२१ व दिनांक २८/०४/२०२२ रोजी पदोन्नतीने पदस्थापनेचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बोरिवली (पश्चिम) मुंबई येथील एस. व्ही. रोडवरील रेल्वे मार्गापासून कल्पना चावला चौकापर्यंतच्या नव्या उड्डाणपुलाच्या कामाबाबत

**(१०) ११०९४ (२०-११-२०२१) श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.चंदूभाई पटेल :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरिवली (पश्चिम) मुंबई परिसरातील कोरा केंद्र येथील एस. व्ही. रोडवरील रेल्वे मार्गापासून कल्पना चावला चौकापर्यंत नव्या उड्डाणपुलासाठी कंत्राटदाराची नियुक्ती सन २०१८ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुलाच्या विस्तारीकरणाचे काम निघाल्यानंतर वाढीव कामासाठी नव्याने निविदा प्रक्रिया राबवून कंत्राटदाराची नियुक्ती नियमानुसार करण्याऐवजी मुंबई महानगरपालिकेने विनानिविदा ११३ कोटी रुपयांचे कंत्राट मूळ कंत्राटदाराला देण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विनानिविदा कंत्राट देण्याची बाब ही गंभीर अनियमितता असल्यामुळे सदर निर्णय स्थगित करुन, निविदा प्रक्रिया राबवून कंत्राट देण्याबाबत मुंबई महानगरपालिकेला आदेश द्यावेत अशी मागणी मा.विरोधी पक्षनेते, विधान परिषद यांनी त्यांच्या दिनांक १४/०९/२०२१ रोजीच्या पत्राव्दारे शासनास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानूसार सदर कामाकरीता पुनर्निवेदेची प्रक्रिया मुंबई महानगरपालिकेने सुरु केली आहे काय व त्याचे स्वरुप काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-०६-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) बोरीवली (पश्चिम) कोरा केंद्र येथील एस.व्ही. रोडवरील सुरु असलेले पुल बांधणीचे काम बोरीवली, कांदिवली, दहिसर या पट्टयांमधील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी प्रस्तावित केले आहे. तथापि, सदर पुलामुळे बोरीवली (पश्चिम) भागातील वाहतूक कोंडीवरील ताण कमी होत असला तरी बोरीवली (पूर्व) येथील राजेंद्र नगर परिसरात खूप मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीचा ताण दिसून आला व हा वाहतुकीचा प्रचंड ताण कमी करण्यासाठी सदर पुलाचे काम पश्चिम द्रुतगती मार्गापर्यंत नेणे आवश्यक होते.

या प्रस्तावित पश्चित द्रुतगती मार्गापर्यंतच्या कामामुळे संपूर्ण दहिसर, बोरीवली, कांदिवली या पट्टयावरील वाहतुकीचा ताण कमी होणार आहे व सदर काम सद्य:स्थितीत सुरु असलेल्या पुलासोबत टप्पा-२ मध्ये करणे आवश्यक असल्यामुळे व कंत्राटदार सन २०१३ च्या दरसूचित काम करण्यास तयार झाल्यामुळे त्यात महानगरपालिकेचे आर्थिक हित साध्य होत आहे.

तसेच सदर वाढीव कामास मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ६९(ई) अन्वये नियमानुसार स्थायी समितीची मान्यता घेण्यात आली असून, तद्नंतर कंत्राटदारास काम करण्याचे आदेश देण्यात आल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) हे खरे नाही.

बोरीवली पश्चिम परिसरातील कोरा केंद्र येथील एस.व्ही. रोडवरील रेल्वे मार्गापासून कल्पना चावला चौकापर्यंत नव्या उड्डाणपुलाचे बांधकाम निर्णयाच्या निश्चितीची छायांकित प्रत मिळणेबाबत मा.विरोधी पक्षनेते, विधानपरिषद यांनी दिनांक १४/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मागणी केली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बांद्रा (बृहन्मुंबई) येथील शासकीय वसाहतीची दुरुस्ती करणेबाबत

**(११) १२२०० (३०-०३-२०२२) श्री.सुरेश धस** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बांद्रा (बृहन्मुंबई) येथील शासकीय अधिकारी/कर्मचारी वसाहतीची प्रचंड पडझड होवून दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बहुतांश ठिकाणी स्लॅबचा थर निघून खाली पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या जीवितास धोका होवु नये म्हणून सदर वसाहतीची दुरुस्ती करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोक चव्हाण (०७-०६-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीतील इमारतीचे संरचनात्मक परिक्षण करण्यात आले असून धोकादायक सदनिका रिक्त करण्यात येत आहे तसेच तातडीच्या अत्यावश्यक दुरुस्तीकरीता सन २०२१-२२ करीता रुपये २०.८८ कोटी रक्कमेचा दुरुस्तीची कामे मंजूर करण्यात आली असून त्यानुषंगाने अत्यावश्यक दुरुस्तीची कामे सुरु करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासंदर्भातील अहवालाच्या शिफारशींबाबत

**(१२) १२५९५ (०६-०४-२०२२) डॉ.सुधीर तांबे** : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० संदर्भात अभ्यास करून शिफारशी करण्यासाठी शासनाने डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू समितीने आपला अहवाल माहे सप्टेंबर, २०१९ च्या तिसऱ्या आठवड्यात सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू अहवालातील शिफारशींबाबत निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२१-०६-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर समितीने आपला अहवाल शासनास दिनांक ३० जून, २०२१ रोजी सादर केला आहे.
(३) सदर धोरणाची राज्यात अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने दिनांक २७ जानेवारी, २०२२ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली कार्यगट स्थापन करण्याचा तसेच विविध विषयांवर समित्या गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार २ समित्या स्थापन करण्यात आल्या असून उर्वरीत समित्या स्थापन करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर शहर व जिल्ह्यातील धर्मदाय रुग्णालयांमध्ये आर्थिक दुर्बल रुग्णांना सवलतीच्या दरात मिळणारे उपचार नाकारले जात असल्याबाबत

**(१३) १२६९८ (२३-०५-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहर व जिल्ह्यातील धर्मदाय रुग्णालयांमध्ये आर्थिक दुर्बल घटकातील रुग्णांवर गरीब रुग्ण निधी (आयपीएफ फंड) अंतर्गत सवलतीच्या दरात उपचार करणे तसेच २० टक्के खाटा राखीव ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेच्या अंमलबजावणीवर निगराणी ठेवण्यासाठी जिल्हा अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर शहर व जिल्ह्यातील अशा धर्मदाय रुग्णालयांमध्ये या योजनेच्या नियमांचे उल्लघंन होत असून अनेक रुग्णांना निधी संपला असल्याचे व इतर कारणे सांगून हक्काचे उपचार नाकारले जात असल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधित निगरानी समितीची गेल्या अनेक महिन्यापासून बैठक झालेली नाही, रुग्णालयांची नियमित पाहणी झालेली नाही तसेच रुग्णालयांचे लेखा परिक्षण सुध्दा झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या गैरप्रकार व अनियमिततेवर आळा घालण्यासाठी संबंधित समितीची नियमित बैठक घेवून रुग्णालयांची नियमित पाहणी करणे व लेखा परिक्षण करणे याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (२०-०६-२०२२) :** (१) होय.

(२) होय.

(३) नाही.

यासंदर्भात धर्मादाय आयुक्त कार्यालय, नागपूर येथील देखरेख समितीसमोर निधी संपला असल्याचे व इतर कारणे सांगून उपचार नाकारले जात असल्याची तक्रार प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(४) होय. जिल्हाधिकारी, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली गठीत जिल्हास्तरावरील समितीच्या बैठकीसाठी दिनांक ०५/०९/२०१८ नंतर समितीच्या सदस्यांना धर्मादाय रुग्णालयांची पाहणी व लेखापरिक्षण याकरीता सुचना प्राप्त झालेल्या नाहीत.

(५) शासन निर्णय विधी व न्याय विभाग, क्रमांक लवेसु-२०१०/७३/(११)/का.१५ दिनांक २२/०७/२०१० नुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याबाबतची कार्यवाही विभागीय आयुक्त यांच्यास्तरावरुन करण्यात येत असून यासंदर्भात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सर्व जिल्ह्यांमध्ये

नियमितपणे बैठका घेण्याबाबत सर्व जिल्हाधीकाऱ्यांना संबंधित विभागीय आयुक्तांमार्फत शासन पत्र क्रमांक बैठक ४४१८/प्र.क्र.०९/का.१५ दिनांक २२/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## निलडोह-डिगडोह (देवी) ता.हिंगणा जि.नागपूर राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१४) १३४७९ (२५-०४-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिनस्थ निलडोह-डिगडोह (देवी)(ता.हिंगणा जि.नागपूर) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना मंजूर असून सदर योजनेचे काम मागील काही वर्षापासून सुरू झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम धिम्या गतीने सुरू असून मागील कित्येक महिन्यांपासून पाईप व इतर बांधकाम साहीत्य रस्त्याच्या बाजूने पडून असून या योजनेचे काम जलदगतीने पूर्ण व्हावे या मागणीकरीता स्थानिक नागरीक व लोकप्रतिनिधी यांनी माहे ऑगस्ट, २०२१ च्या दरम्यान आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू योजनेचे प्रलंबित काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (१४-०६-२०२२) :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय, खरे आहे.

सदर योजनेचा दिनांक १७/०९/२०१९ ला कार्यारंभ आदेश देण्यात आला. ग्रामपंचायतीने ESR ची जागा न देणे, Covid-१९च्या प्रादुर्भावामुळे, पाईप व सार्वजनिक बांधकाम विभागाची परवानगी उशिराने प्राप्त झाल्यामुळे

कामाची गती कमी होती. कामे पूर्ण होण्याकरीता स्थानिक नागरीक व लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २३ व २४ ऑगस्ट, २०२१ ला आंदोलन केले होते.

(३) व (४) या अनुषंगाने कंत्राटदारास करारनाम्याच्या अटी व शर्तीनुसार कार्यवाही करण्याबाबत ताकीद देण्यात आलेली असून,उपविभागीय अभियंता यांच्या पत्रान्वये सूचित करण्यात आले आहे. योजनेची जवळपास ६४ टक्के कामे पूर्ण झालेली आहे. तसेच पुढील सहा महिन्यात कामे पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

---

## समग्र शिक्षा अभियानांतर्गत जिल्हा परिषद नागपूर येथील शाळांची निधीच्या अभावामुळे प्रलंबित असलेली बांधकामे पूर्ण करण्याबाबत

**(१५) १३५०३ (२५-०४-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समग्र शिक्षा अभियान सन २०२०-२०२१ मध्ये जिल्हा परिषद नागपूर अंतर्गत जिल्ह्यातील ३२ शाळांमध्ये सुमारे २ कोटी ४७ लाख खर्चाची विविध बांधकामे मंजूर करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेच्या प्रथम टप्प्यात ५० टक्के निधी उपलब्ध करून देण्यात आला व त्यानुसार शाळा व्यवस्थापन समित्यांनी शाळांची बांधकामे सुरू केली, परंतु उर्वरीत ५० टक्के निधी उपलब्ध न झाल्यामुळे अनेक बांधकामे अर्धवट प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू शाळांच्या बांधकामाकरीता ज्यांनी स्वत: जवळचे पैसे खर्चुन किंवा उधारी तत्वावर बांधकामे पूर्ण केली अशा शाळांना आर्थिक समस्येला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उर्वरीत निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१७-०६-२०२२) :** (१) होय.

(२) होय.

(३) हे खरे नाही.
(४) समग्र शिक्षा अंतर्गत वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक सन २०२०-२१ अंतर्गत जिल्हा परिषद, नागपूर यांना ३२ मोठ्या शाळांच्या दुरुस्तीकरीता रुपये २४७.७० लक्ष निधी मंजूर असून संबंधित शाळांच्या शाळा व्यवस्थापन समित्यांच्या खात्यावर अग्रिम निधी रुपये ११२.३० लक्ष वर्ग करण्यात आला आहे. निधी उपलब्धतेनुसार उर्वरित निधी वितरणाची तजवीज ठेवली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## छोट्या संवर्गातील आरक्षणाच्या आकृतीबंधातून अनुसूचित जमाती प्रवर्गाला डावलण्यात येत असल्याबाबत

**(१६) १३६१० (२०-०५-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामान्य प्रशासन विभागाने छोट्या संवर्गातील पदे भरण्यासाठी आरक्षण पदाचा नवा आकृतिबंध तयार करुन याबाबत दिनांक २५ फेब्रुवारी, २०२२ रोजी शासन निर्णय जारी केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवीन आकृतीबंधानुसार आरक्षणाच्या बिंदुनामावलीत अनुसूचित जमातीला आठवा क्रमांक देण्यात आला असून यापुर्वी दिनांक २७ मार्च, १९९७ व दिनांक २९ मे, २०१७ मधील बिंदुनामावली संदर्भातील शासन निर्णयात अनुसूचित जमातीला चौथा क्रमांक देण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यापूर्वी ४ पदे भरतीच्या प्रक्रियेत अनुसूचित जमातीला प्रतिनिधीत्व मिळत होते पण आता किमान ८ पदे भरती असेल तरच प्रतिनिधीत्व प्राप्त होऊ शकते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यामुळे अनुसूचित जमाती प्रवर्गात रोष निर्माण झाला असल्याने नवीन शासन आदेश रद्द करुन दिनांक २९ मे, २०१७ चा शासन निर्णय कायम ठेवण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (१३-०६-२०२२) :** (१) मा.सर्वोच्च न्यायालयाने एसईबीसी आरक्षण अधिनियम, २०१८ रद्द केल्यानंतर सुधारीत आरक्षणानुसार छोटया संवर्गातील पदे भरण्याबाबतची कार्यपध्दती दिनांक २५/०२/२०२२ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेली आहे.

(२) व (३) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २९ मार्च,१९९७ च्या शासन निर्णयान्वये सरळसेवा भरतीसाठी १०० बिंदू नामावली व पदोन्नतीसाठी ५० बिंदू नामावली विहित केलेली आहे. दिनांक २९/०३/१९९७ च्या शासन निर्णयान्वये छोटया संवर्गातील पदभरतीबाबतची कार्यवाही विहित केलेली नाही.

दिनांक २९/०५/२०१७ व दिनांक २५/०२/२०२२ च्या शासन निर्णयान्वये छोटया संवर्गासाठी बिंदू नामावली विहित केलेली आहे.

दिनांक २९/०५/२०१७ च्या शासन निर्णयान्वये एकूण ५२% आरक्षणानुसार छोटया संवर्गातील पदांच्या आरक्षणाची गणना करण्यात आलेली आहे. ५२% आरक्षणानुसार ४ पदांकरीता आरक्षणाचे १ पद उपलब्ध होत होते. ते अ.जा., अ.ज., वि.जा.(अ), भ.ज.(क), भ.ज.(ब), भ.ज.(ड), वि.मा.प्र., या क्रमाने आळीपाळीने उपलब्ध करुन देण्यात आले होते. तसेच ८ पदाकरीता ३ आरक्षित पद उपलब्ध होत होती. त्यापैकी १ पद अनुसूचित जमातीला कायमस्वरुपी उपलब्ध होते.

दिनांक २५/०२/२०२२ च्या शासन निर्णयान्वये एकूण ६२% आरक्षणानुसार ४ पदांकरीता आरक्षणाची दोन पदे उपलब्ध होतात. त्यापैकी १ पद अजा व अज यांना आळीपाळीने व दुसरे पद विजा(अ), भज(ब), इमाव, भज(क), आदुघ, भज(ड) व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने उपलब्ध करुन देण्यात आले आहे. तसेच ८ पदांमध्ये ५ आरक्षित पदे उपलब्ध होत असून त्यापैकी १ पद अनुसूचित जमातीला कायमस्वरुपी उपलब्ध झालेले आहे.

दिनांक २९/०५/२०१७ व २५/०२/२०२२ च्या दोन्ही शासन निर्णयान्वये ८ पदसंख्या असलेल्या पदांना अनुसूचित जमातीचे कायमस्वरुपी पद उपलब्ध झालेले आहे.

(४) दिनांक २९/०५/२०१७ च्या शासन निर्णय हा ५२% आरक्षणानुसार छोटया संवर्गातील पदभरतीसाठी निर्गमित केलेला आहे. सद्य:स्थितीत ६२% आरक्षण असल्यामुळे दिनांक २९/०५/२०१७ चा शासन निर्णय कायम ठेवता येणार नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ग्रामपंचायत अंबाडा (सयवाडा)(ता.नरखेड,जि.नागपूर) अंतर्गत पाईपलाईन कामातील अनियमिततेबाबत

**(१७) १३६२७ (२९-०४-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामपंचायत अंबाडा (सयवाडा)(ता.नरखेड, जि.नागपूर) अंतर्गत जल जिवन मिशन योजनेमध्ये पाईप लाईनचे काम सद्य:स्थितीत सुरू आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पाईपलाईनचे काम अंदाजपत्रकानुसार होत नसून कंत्राटदार आपल्या मर्जीने व सोईने सदरहू काम करीत असून निकृष्ट दर्जाचे काम होत असल्याबाबत स्थानिक ग्रामपंचायत सदस्य व अन्य पदाधिकाऱ्यांनी संबंधित विभागाकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू तक्रारीची दखल घेवून सदर कामअंदाजपत्रकानुसार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (१४-०६-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) त्यानुषंगाने सदर प्रकरणी विभागीय स्तरावर प्रत्यक्ष मौका पहाणी करुन सादर केलेल्या दिनांक १४/०२/२०२२ रोजीच्या चौकशी अहवालानुसार, ग्रामपंचायतच्या मागणी व ठरावानुसार दोन ते अडीच फुटावर पाईप लाईनचे काम करण्यात आहे आहे, टाकलेली पाईपलाईन सुरक्षित असून लिकेज किंवा Damage होण्याची संभावना दिसुन येत नाही. आतापार्यंत झालेले काम वगळुन उर्वरित पाईपलाईन अंदाजपत्रकानुसार ३ फुटावर टाकणेबाबत संबंधितांना निर्देश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात ५० टक्के पेक्षा कमी उपस्थिती असणाऱ्या शाळा बंद करण्याच्या निर्णयाबाबत

**(१८) ४५५२५ (२०-०१-२०१४) श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतीश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दर्राणी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात झालेल्या शाळांच्या विशेष पट पडताळणी मोहिमेनुसार ५० टक्के पेक्षा कमी उपस्थिती असलेल्या प्राथमिक/ माध्यमिक व त्यामध्ये अनुदानित शाळांची संख्या व त्यामध्ये कार्यरत शिक्षक/ कर्मचाऱ्यांची संख्या किती आहे,

(२) तसेच, या ५० टक्के पेक्षा कमी उपस्थिती असणाऱ्या शाळा बंद करण्याच्या शासन निर्णयाला मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या शाळांना पुन्हा एक संधी देण्याबाबत शासनस्तरावर काय निर्णय घेण्यात आलेला आहे वा येत आहे,

(४) असल्यास, विशेष पट-पडताळणीमध्ये राज्यातील प्राथमिक व माध्यमिक भागातील किती शिक्षक व कर्मचारी अतिरिक्त ठरले आहेत, त्यांचे समायोजन पूर्ण झाले आहे काय,

(५) उपरोक्त प्रकरणी अद्याप कोणतीच कार्यवाही झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२०-०६-२०२२) :** (१) प्राथमिक शाळांची संख्या १४०४ व माध्यमिक शाळांची संख्या ६७ आहे.

(२) होय.

(३) व (४) यासंदर्भातील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खाजगी प्राथमिक मराठी तसेच प्रादेशिक भाषेतील मान्यताप्राप्त विनाअनुदानित शाळांना अनुदान देवून अन्य मागण्या पूर्ण करण्याबाबत

**(१९) ४७०७३ (०५-०७-२०१९) डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खाजगी प्राथमिक मराठी तसेच प्रादेशिक भाषेतील मान्यता प्राप्त विनाअनुदानित शाळेतील शिक्षक अनुदानाअभावी ४ ते ५ हजार रुपयात काम करीत असून वेळेवर वेतन मिळत नसल्याने तसेच अनुदान देण्याबाबत शासन दुर्लक्ष करित असल्याने राज्यातील विनाअनुदानित शाळांमधील शिक्षकांनी अनुदान आणि अन्य मागण्यांसाठी आझाद मैदानात २५ दिवस आंदोलन केले असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील शिक्षकांच्या मागण्यांसाठी महापालिकेच्या अर्थसंकल्पात तरतूद करावी, अशी मागणी सर्वपक्षीय सदस्यांनी स्थायी समितीच्या बैठकीत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शाळांना अनुदान देऊन शिक्षकांच्या वेतनात वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२०-०६-२०२२) :** (१) व (२) होय,

बृहन्मुंबई परिक्षेत्रातील खाजगी प्राथमिक विनाअनुदानित शाळेतील कर्मचाऱ्यांनी दिनांक ११/०२/२०१९ ते दिनांक ०१/०३/२०१९ पर्यंत १८ दिवस उपोषण केले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या गटनेत्यांच्या सभेत खाजगी प्राथमिक विनाअनुदानित शाळांना वेतन अनुदान देण्याबाबत मागणी करण्यात आली होती.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्यांच्या अखत्यारीत मान्यता दिलेल्या खाजगी प्राथमिक विनाअनुदानित शाळांचे अनुदान शैक्षणिक वर्ष २००१-२००२ पासून यापुढील कालावधीत राज्य शासनाच्या अनुदानासाठी ग्राहय धरले जाणार नाही, असा निर्णय शासन पत्र, दिनांक १३/०१/२००४ अन्वये घेण्यात आला आहे. तसेच, सदरहू बाब पुनश्च: दिनांक २२/०३/२०१७ व दिनांक १०/०७/२०२० च्या पत्रान्वये आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना कळविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## यवतमाळ जिल्हयातील ग्रामीण भागासह शहरी भागातील शाळांमध्ये अग्निशमन यंत्र व प्रथमोपचार पेटी उपलब्ध करून देण्याबाबत

**(२०) ४७५२२ (०५-०७-२०१९) डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील ग्रामीण भागासह शहरी भागातील अनेक शाळांमध्ये अग्निशमन यंत्र व प्रथमोपचार उपचार पेटी उपलब्ध नसल्याचे माहे मार्च, २०१९ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अग्निशमन सुरक्षेबाबत शासनाने दिनांक २७ नोव्हेंबर, २०१० रोजी दिलेल्या आदेशाचे शाळा व्यवस्थापन समिती पालन करीत नसल्याने शालेय विद्यार्थ्यांच्या जीवितास अपघात झाल्यास धोका निर्माण होण्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार यवतमाळ जिल्हयातील ग्रामीण भागासह शहरी भागातील शाळांमध्ये अग्निशमन यंत्र व प्रथमोपचार पेटी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२४-०५-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

जिल्हा परिषद, यवतमाळ अंतर्गत प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक अशा एकूण २०७८ शाळांना अग्निशमन संयत्र वितरीत करण्यात आले आहे. सन २०१९-२० च्या शाळांच्या संख्येनुसार, ३१ वाढीव अग्निशमन यंत्रे पुरवण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच, अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांना संस्था अंतर्गत निधीतून अग्निशमन यंत्रे पुरविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.